१२६०

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. १२६०

# बापूजींच्या गोड गोष्टी

BVBK-0401260
BVBK-0401260

# बापूजींच्या गोड गोष्टी

भाग सहावा

१२६० दि. २०।५।५९
बा.वा.

साने गुरुजी

BVBK-0401260
BVBK-0401260

साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २

किंमत : ४० नये पैसे

# दोन शब्द

साने गुरुजींनीं १९४८ सालीं मुंबईहून 'कर्तव्य' हें सायंदैनिक सुरू केलें होतें. त्या दैनिकांत गुरुजी नियमानें गांधीजींच्या जीवनांतील वेंचक प्रसंगांच्या कथा देत असत. त्या कथांच्या जोडीला आणखी भर घालून बापूजींच्या गोड गोष्टींचे हे सहा भाग गुरुजींनीं तयार केले. या सहा भागांत मिळून १२२ गोष्टी दिलेल्या आहेत.

या गोड गोष्टी सांगतांना जाणूनबुजून गुरुजींनीं विषयानुक्रम किंवा कालानुक्रम ठेवला नव्हता. गांधीजींचें विविधरंगी, विविधगंधी मंगल दर्शन व्हावें या दृष्टीनें या पुस्तकांची रचना करण्यांत आली आहे. मुलांना विविधतेंत मौज वाटते म्हणून ही अशी मोकळी रचना.

सहाहि भागांचीं पुनर्मुद्रणें काढण्याचें भाग्य 'साधना प्रकाशना'ला लाभलें, हा कथाविषय आणि कथालेखक यांचा महिमा आहे. गांधीजींच्या भक्तिप्रेमानें ओथंबलेल्या साने गुरुजींच्या भावप्रधान लेखणींतून उतरलेल्या ह्या प्रेरक प्रसंगकथा आहेत. ह्या छोट्या गोष्टी 'छोट्यांच्या जीवनांच्या दृष्टीनें भारी मोलाच्या आहेत.

पहिल्या आवृत्त्यांप्रमाणेंच हीं पुनर्मुद्रणेंहि सर्वत्र जावोत.

— प्रकाशक

तिसरी आवृत्ति : ऑगस्ट १९६२ : © साधना ट्रस्ट

प्रकाशक : प्रभाकर सिद्ध, साधना प्रकाशन, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २.
मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २.

# बापूजींच्या गोड गोष्टी

पांचव्या भागावरून पुढें सुरू

## ९६

महात्माजींनीं भारतव्यापी सत्याग्रह पहिल्यानेंच सुरू केला होता. त्यांनीं मारलेली हांक भारताच्या हृदयाला जागृत करती झाली. जणूं दहा हजार वर्षांच्या राष्ट्राच्या इतिहासांतील आत्मशक्ति हांक मारीत होती. ती हांक ओळखीची वाटली. ‘ प्रार्थना करा, उपवास करा, आत्मसमर्पण करा, अशी ती हांक होती. त्या हांकेनें लाखोंच्या जीवनांत क्रान्ति झाली.

गांधीजी साबरमती आश्रमांत होते. आणि एक धिप्पाड तरुण त्यांना भेटायला आला. गांधीजींचें वजन फार तर शंभर पौंड, तर या राजबिंड्या तरुणाचें दोनशेंहून अधिक. महात्माजींच्या चरणांना स्पर्श करून त्या तरुणानें त्यांच्या हातांत पत्र दिलें. महात्माजी गंभीर झाले. नंतर हंसून म्हणाले :
“ मग काय करायचें ? ”

" मला नाहीं म्हणूं नका. मला मुलगा म्हणून माना. जणूं मांडीवर घेतलेला. "

" माझी मांडी किती लहान, तूं कसा मावणार त्या मांडी-वर ?" बापू हंसून म्हणाले.

जमनालालजींच्या डोळ्यांत पाणी आलें. शेवटीं महात्माजी म्हणाले : " बरें तर. हो माझा मुलगा. मी माझ्याकडून पित्याचें नातें ठेवीन. पुत्राचें नातें ठेवण्याचें तुझें काम ! "

जमनालालजींचा आनंद गगनांत मावेना. आणि अखेरपर्यंत हें नातें राहिलें.

* * *

## १७

गांधीजी सेवाग्रामला होते. जमनालालजी इतर सर्व व्याप सोडून गोरक्षणाला वाहून घेणार होते. त्या विचारानें त्यांना वेडें केलें होतें. परंतु जमनालालजी अकस्मात् आजारी झाले. डॉक्टर धांवले. सेवाग्रामहून महात्माजी आले. जमनालालजी बरे नाहीं झाले. देवाघरीं गेले. विनोबाजी म्हणाले : " त्यांच्या मनांत जे विचार उसळत होते ते देहांत मावूं शकले नाहींत. देह फाडून ते बाहेर निघाले. " गांधीजी अति दुःखी झाले.

वास्तविक ते स्थितप्रज्ञ. परंतु गांधीजींच्या जीवनांत करुण मानवता होती. दिवस गेला. परंतु त्या दिवशीं रात्रीं गांधीजींना झोंप आली नाहीं. म्हणाले :" मी निराधार झालों. आतां माझा बोजा कोण सांभाळील ?"

* * *

## १८

महात्माजींच्या जीवनसाधनेंत सहस्रावधि लहान थोर जगभर सामील झालेले होते. परंतु मगनभाई तर सेवकांचें मुकुटमणि. महात्माजींच्या मनांत एखादा विचार येतांच तो प्रत्यक्षांत आणण्यासाठीं मगनलालभाई सारी अन्तर्बाह्य शक्ति ओतायचे. १९२८ मध्यें ते देवाघरीं गेले. " मंगल मंदिर खोलो " ( देवा, तुझें मंगल दार उघड ), हें स्वकृत भजनगीत आळवीत ते देवाघरीं गेले.

महात्माजींचें दुःख असीम होतें. ते म्हणाले :" त्याच्या मरणानें मी विधवा झालों !"

* * *

## ११

अजून साबरमतीचा आश्रम सुरू झाला नव्हता. अहमदाबादचाच एक भाग कोचरब. तेथें आश्रम होता. आणि काशीहून विनोबाजी महात्माजींचें दर्शन घ्यायला निघाले. बनारस हिंदु विद्यापीठांतील गांधीजींचें तें तेजस्वी भाषण विनोबाजींनीं ऐकलें होतें. जें हवें होतें तें जणूं त्यांना मिळालें. गांधीजींबरोबर त्यांचा पत्रव्यवहार झाला. आणि त्याचा परिणाम म्हणून ते येत होते.

विनोबाजी आले तों त्यांना काय दिसलें ? महात्माजी विळी घेऊन भाजी चिरीत होते. भाजी चिरतां चिरतां उभयतांचें बोलणें सुरू होतें. गीतेवर, ईश्वरी श्रद्धेवर बोलणें चाललें होतें.

" ईश्वरावर श्रद्धा ठेवून जो जगतो, कार्य करतो, रामनाम हा ज्याचा आध्यात्मिक चारा, तो कधींहि आजारी पडणार नाहीं. "—महात्माजी म्हणाले.

" होय. "—विनोबाजी म्हणाले.

महात्माजींची रामनामावरची श्रद्धा दिवसेंदिवस वाढतच गेली व दिल्लीच्या अखेरच्या उपवासांत ती पराकोटीला पोंचली होती.

* * *

## १००

गोलमेज परिषदेला आगबोटींतून महात्माजी जात होते. बोटींतील इंग्रज लोकांचीं मुलें गांधीजींच्या खोलीकडे डोकावून बघायचीं. पुढें या मुलांची ओळख झाली. गांधीजी त्यांचे कान पकडून पाठीवर थापट्या मारायचे. नंतर म्हणायचे : "हा खाऊ पुरे ना आतां? आतां दुसरा कोणता हवा? खजूर कीं द्राक्षें?"

"खजूर नको, द्राक्षें, द्राक्षें."—मुलें म्हणत. आणि मुलें बश्या भरून द्राक्षें घेऊन जात व रिकाम्या करून पटकन् आणीत.

"आतां आज पुरेत."—गांधीजी हंसून म्हणत नि तीं निष्पाप मुलें अभिनंदन करून जात!

* * *

## १०१

दांडी–प्रयाणाचे ते दिवस. महात्माजी पायीं जात होते. जणूं रामरायाचें चालणें. साऱ्या राष्ट्राला स्फूर्ति मिळत होती. राष्ट्राच्या जीवनांत राम येत होता.

सायंकाळीं एके गांवीं सभा झाली. प्रार्थना झाली. आतां

मही नदी ओलांडून पलीकडे जायचें होतें. भरतीचें पाणी आलेलें असलें म्हणजे नाव थेट पलीकडच्या तीरापर्यंत जाई. परंतु भरती पुरी होऊन आतां ओहोटीची वेळ होती. पुरी ओहोटी लागायच्या आंत पलीकडे जायला हवें होतें. नाहींतर पाणी कमी होऊन नाव जातीना. मही नदीच्या चिखलांतून महापुरुषाला रात्रीच्या वेळीं चालत जावें लागलें असतें.

नाव तयार झाली. महात्माजी नावेंत बसले. गुहाच्या नावेंत बसलेले जणूं प्रभु रामचंद्र ! परंतु गांधीजींबरोबर जातां यावें म्हणून नावेंत किती माणसें चढलीं ! नाहीं कोणाला म्हणायचें? नाव भराभर नेणें प्राप्त होतें. ओहोटी लागली होती. झपाट्यानें पाणी कमी होत होतें. जड नाव वल्हवून नेणें जड जात होतें. अखेर नाव रुतली. पाणी फारच कमी. राष्ट्रपुरुष हातांत काठी घेऊन खालीं उतरला ! एकेक पाऊल कष्टानें टाकावें लागत होतें. मही नदींत अपार चिखल असतो. कोठें कोठें गुडघ्याहून अधिक चिखल होता. परंतु न थकतां, न त्रासतां खंबीरपणें महात्माजी जात होते. त्यांना अंतर चालून जायला एका तासाहून अधिक वेळ लागला.

गांधीजी पलीकडे पोंचले असतील नसतील तों या तीरावर पंडित जवाहरलालांची मोटार येऊन थडकली. ते त्या वेळेस राष्ट्राध्यक्ष होते. महात्माजींना भेटायला आले होते. गांधीजी तर पलीकडे गेले. ओहोटी पुरी झालेली. नाव चालणें अशक्य.

" पंडितजी, काय करायचें ? "—कोणीं विचारलें.

" मी पायीं जातों " ते म्हणाले.

" खूप चिखल आहे. दमून जाल. "

" ते वृद्ध असून गेले. मी तर तरुण आहें. "

जवाहरलालांनीं कपडे वर केले. आणि चिखलांतून राष्ट्रपित्याला भेटायला निघाले. पित्याला शोभेसा हा वारसदार पुत्र होता. जातांना नेहरू म्हणाले : " मीं भेटून लगेच परत येईन. " परंतु त्या अनंत चिखलांतून जातां जातां नेहरू थकले. गांधीजींना जाऊन ते भेटले. परंतु परत जाण्याचें धाडस नेहरूंनीं त्याच रात्रीं केलें नाहीं. नेहरू जेथें थकले तेथें राष्ट्रपिता न थकतां गेला. कोठून आली ही शक्ति ? इच्छाशक्तीची, कृतसंकल्पाची ?

* * *

## १०२

महात्माजींबरोबर दांडी यात्रेच्या वेळेस ८० सत्याग्रहींची तुकडी होती. दंडधारी गांधीजी आपली पिशवी खांकेला अडकवून सर्वांच्या पुढें असत. शहामृगाप्रमाणें झपझप पावलें टाकीत ते चालत. रेंगाळत चालणें गांधींजींना कधींहि आवडत नसे. ते फिरायला जातांनाहि वेगानें चालायचे. त्यांचें फिरणें व्यायामासाठीं असे.

महात्माजींच्या बरोबरचे सत्याग्रही दमायचे, थकायचे. शेवटीं महात्माजींनीं 'यंग इंडिया'त त्या वेळेस व्यायामावर लेख लिहिला. महात्माजी अहिंसेचे उपासक होते याचा अर्थ कोणी करतात कीं, त्यांना दुबळेपणा हवा होता. ही साफ चुकीची कल्पना आहे. महात्माजींना निरोगी, सामर्थ्यसंपन्न शरीरें व त्याहूनहि सामर्थ्यसंपन्न मनें हवीं होतीं. राष्ट्राला सत्याग्रहाचा संदेश देणारा राष्ट्रपिता त्या वेळेस व्यायामावर लिहिता झाला. आणि त्या लेखांत ते लिहितात : " निदान फिरण्याचा व्यायाम तरी सर्वांना घेतां येईल. फिरायला जाणें हा व्यायाम सर्व व्यायामप्रकारांचा राजा होय. "

* * *

## १०३

१९३२ मध्यें हरिजनांसाठीं महात्माजींनीं उपवास केला. जातीय निवाडा त्यांनीं बदलून घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं संमति दिली. महात्माजींनीं तुरुंगांतूनच 'हरिजन' पत्र सुरू केलें. पुढें सरकारनें त्यांना सोडलें. ते अमदाबादला गेले. साबरमतीचा आश्रम जप्त करा म्हणून सरकारला त्यांनीं कळविलें. लढा चालू होता. सरकार आश्रम घेईना तेव्हां

महात्माजींनीं तो हरिजन-सेवेसाठीं हरिजन-सेवक-संघाच्या ताब्यांत दिला आणि स्वतः कायदेभंगाचा प्रचार करायला निघाले. कारण देशभर चळवळ चालू होती. अमदाबादजवळच्या एका खेड्यांत ते गेले. सरकारनें त्यांना पकडून येरवड्यांत आणून ठेवले. तेथून पूर्वीप्रमाणें हरिजन साप्ताहिकासाठीं लख लिहायची परवानगी त्यांनीं मागितली. ती सवलत सरकार देईना. महात्माजींनीं उपवास सुरू केला. सरकारनें त्यांना पुन्हां सोडलें, तेव्हां येरवडा गांवांतच सत्याग्रह करायला महात्माजी निघाले. सरकारनें त्यांना पुन्हां पकडून आणले. त्यांनीं पुन्हां हरिजन पत्रासाठीं लिहायची परवानगी मागितली. नाटाळ सरकारनें ती नाकारली. आणि राष्ट्रपित्यानें पुन्हां उपवास सुरू केला. पुन्हां सुटका झाली. सरकार जणूं अंत पाहत होतें. परंतु सरकारला लाजलज्जा नसली तरी गांधीजी सद्भिरुचीचे उपासक. हा उंदरामांजरांचा खेळ कोठवर चालायचा? उन्मत्त साम्राज्यशाही राष्ट्रपित्याचा पदोपदीं अपमान करीत होती. अखेर महात्माजींनीं ठरविलें कीं, सरकारनें सोडले तरी वर्षभर तुरुंगांतच आहें असें समजून राजकीय कार्य करायचें नाहीं. अस्पृश्यता-निवारणार्थ देशभर दौरा काढण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु दौऱ्याआधीं पर्णकुटींत त्यांनीं २१ दिवस उपवास केला. त्यावेळेस त्यांचे सहकारी स्वामी आनंद व खाजगी चिटणीस प्यारेलाल नाशिक तुरुंगांत होते. महात्माजींनीं त्यांना पत्रांत लिहिलें : "हरिजन कार्याला श्रीमंत लोक आर्थिक

मदत तर करतील. परंतु उपवासानें मी आधीं आध्यात्मिक भांडवल देत आहें."

* * *

१०४

उपवास सुरू झाला. नाशिक तुरुंगांत प्यारेलालजी अस्वस्थ होते. ते म्हणायचे : "बापूंच्या सर्व उपवासांच्या वेळेस मी त्यांच्याजवळ असें. एनिमा किती द्यायचा, पाणी किती कसें द्यायचें, सारें मला माहीत. परंतु या वेळेस मी त्यांच्याजवळ नाहीं." गांधीजींकडून पत्र आलें : "उपनिषदांत म्हटलें आहे 'तदंतिके तद्दूरं' आत्मा जवळहि आहे, दूरहि आहे. दूर असलेल्या आत्म्याच्या तो जवळच आहे असा अनुभव अशाच प्रसंगीं घ्यायचा असतो. नाहीं का ?"

* * *

१०५

महात्माजींचा उपवास चालू होता. नाशिक तुरुंगांत त्यांचीं पत्रें यायचीं. पत्रांत उपवासाविषयीं फारसें न लिहितां स्वामी

आनंद वगैरेंना तुमची प्रकृति कशी आहे असें विचारीत. उपवासांतहि ते दुसऱ्याची चिंता वहायचे. आणि एकदां पत्रांत पुढील मजकूर होता : "मी अन्न घेत नाहीं हें खरें. पाण्याशिवाय इतर रसहि घेत नाहीं. परंतु रामनामाचा रस तरीं पोषण देऊन राहिलाच आहे !"

* * *

## १०६

याच उपवासाच्या वेळचें महादेवभाईनीं नाशिकच्या तुरुंगांत पाठवलेलें एक पत्र आठवतें. उपवास चालू होता. पर्णकुटीच्या व्हरांड्यांत खाटेवर महापुरुष पडून होता. त्यांना जरा झोंप लागली होती. सभोंवार सुंदर गंभीर सृष्टि होती. महादेव–भाईनीं लिहिलें : "बापू झोंपले आहेत. एखाद्या लहान बालकाप्रमाणें झोंपले आहेत. जणुं विराट् सृष्टिमातेच्या कुशींत हें बाळ झोंपलें आहे. केवढें भव्य व उचंबळणारें हें दृश्य !"

* * *

## १०७

सेवाग्रामला असतांना महात्माजी सकाळीं फिरायला जात. फिरून परत येतांना कोणी आजारी असलें तर त्याच्या

झोंपडीवर जाऊन ते विचारपूस करीत. एकदां एका झोंपडी-जवळ ते आले. त्यांच्या कानांवर पुढील सुंदर अभंग-चरण आले :

संत जेणें व्हावें । जग–बोलणें सोसावें
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान
थोरपण जेथें वसे । तेथें भूतदया असे
रागें भरावें कवणासीं । आपण ब्रह्म सर्व देशीं
ऐशी समदृष्टि करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
विश्व झालिया वन्हि । संतमुखें व्हावें पाणी
तुम्ही तरोन विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

गांधीजी ते चरण ऐकून तन्मय झाले. झोंपडीबाहेर उभे राहून ते अभंग कानांनीं पीत राहावें असें त्यांना वाटलें.

श्री परचुरे शास्त्री ते अभंग सुस्वर आवाजांत म्हणत होते. मुक्ताबाईचे हे ताटीवरचे अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांतील चरण आठवतील तसे ते म्हणत होते. परचुरे शास्त्र्यांना ते अभंग फार आवडायचे.

थोड्या वेळानें समाधि उतरल्यावर गांधीजी झोंपडींत आले व म्हणाले :

"शास्त्रीजी, हे अभंग मला उतरून द्या. मी ते पाठ करणार आहें. किती प्रेमळ आणि किती उदात्त! कोणाचे हे अभंग?"

" मुक्ताबाईचे. ज्ञानेश्वर महाराजांची ती धाकटी बहीण. एकदां आळंदीस असतांना ज्ञानेश्वर रस्त्यांतून जात होते. ' संन्याशाचा पोरगा दृष्टीस पडला, अपशकुन झाला ' असें कांहीं टवाळ लोक मोठ्यानें ओरडले. ज्ञानेश्वर विषण्ण झाले. ते खोलींत जाऊन दार लावून बसले. मुक्ताबाई पाणी आणण्यासाठीं गेली होती. ती आली तों दार बंद. तेव्हां तिनें जे अभंग केले ते 'ताटीवरचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. प्रत्येक अभंगाच्या शेवटीं ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' असें आहे. "

परचुरेशास्त्र्यांना सारे अभंग नीट आठवत ना. त्यांनीं पुण्यास प्रा. दत्तोपंत पोतदार यांना लिहून ते सारे अभंग मागून घेतले व गांधीजींना लिहून दिले.

* * *

## १०८

महात्माजी अलाहाबादला गेले होते. ते आनंदभवनांत उतरले होते. कमला नेहरू स्मारक दवाखान्याचा पाया घालायचा होता म्हणून ते आले होते. १९३९ च्या नोव्हेंबरची २३ तारीख होती.

गांधींजींना एक न्हावीदादा हवा होता. जवाहरलालजींचे

खाजगी चिटणीस श्री. उपाध्याय यांनीं एका कुशल न्हावीदादास बोलाविलें. त्याचें नांव पुन्नीलाल. श्री. उपाध्यायांनीं स्वच्छ खादीचे कपडे त्याला घालायला दिले. ते कपडे त्याला नीट होत नव्हतें. तरीपण ते पेहरून आनंदभवनाच्या दुसऱ्या मजल्यावर तो गेला. गांधीजी वर्तमानपत्रें वाचीत होते. त्याला पाहून ते म्हणाले :

"अरे तुम आगये. तुम अच्छा बाल बनाते हो न ?"

न्हावीदादा नम्रतेनें स्मित करता झाला. तो गांधीजींची डोयी करायला बसला. त्यानें त्यांची दाढीहि केली. गांधीजी थट्टा विनोद करीत होते, त्याला त्याच्या घरची हकीगत विचारीत होते. मध्येंच त्यांनीं विचारलें : "तूं नेहमीं खादी वापरतोस वाटतें ?"

"नाहीं. हे कपडे तात्पुरते उसने आहेत."

गांधीजींना त्यानें खरें सांगितल्यामुळें बरें वाटलें. गांधीजींची डोयी केली जात असतां श्री उपाध्यायांनीं फोटो घेतला.

काम झालें. न्हावीदादा जायला निघाला. त्यानें गांधीजींना प्रणाम केला. बापू म्हणाले :

"तुम अच्छा बाल बनाते हो."

"तो मुझे सर्टिफिकिट दीजिये."

"जबतक तुम अच्छा काम करते रहोगे तबतक सर्टिफिकिटकी जरूरतही क्या ?

परंतु न्हावीदादानें गळ घातली. अखेर गांधीजी तयार झाले. तो पहा कागद आणण्यांत आला. बापू लिहूं लागलें :

आनंद भवन, इलाहाबाद

भाई पुन्नीलालनें बडे भावसे अच्छी तरह मेरी हजामत की है। उनका उस्तरा देहाती है और बगैर साबुनके हजामत करते है।

२३।११।३९ मो. क. गांधी

[ अर्थ : भाई पुन्नीलालनें मोठ्या प्रेमानें माझी डोयी केली. त्याचा वस्तरा खेड्यांत तयार झालेला आहे व साबणाशिवाय तो हजामत करतो. ]

जणुं पृथ्वीमोलाचा ठेवा मिळाला अशा आनंदानें न्हावीदादा निघाला. जवाहरलालजींनीं त्याला दोन रुपये कारागिरीचे दिले. आणि उपाध्यायांजवळून तो फोटोहि घेऊन गेला. तो फोटो व तें प्रशस्तिपत्र म्हणजे पुन्नीलालच्या मालकीच्या दोन अमोल वस्तू. एकजण शंभर रुपये देत होता परंतु पुन्नीलाल त्या वस्तु द्यायला तयार होईना ! श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं मोठ्या मिनतवारीनें त्या फोटोचा व प्रशस्तिपत्रकाचा फोटो घेऊन प्रसिद्ध केला तेव्हां ही गंमत जगाला कळली !

* * *

## १०९

महात्माजी स्वाक्षरीचे कमीत कमी पांच रुपये घेत. परंतु कधीं कधीं ते गंमत करीत. एकदां एक अमेरिकन गृहस्थ स्वाक्षरीसाठीं महात्माजींकडे आला.

"तुमच्याजवळ पैसे किती आहेत ?" महात्माजींनीं विचारलें. त्यानें आपलें पाकिट खिशांतून बाहेर काढलें. त्यानें पैसे मोजलें. ३१० रुपये भरले. महात्माजींनीं त्याचें पाकिट हातांत घेतलें व त्यांतील पैसे घेऊन त्यांनीं रिकामें पाकिट परत केलें. स्वाक्षरी दिली.

परंतु तो अमेरिकन गृहस्थ गोंधळल्यासारखा दिसला. महात्माजी हंसून म्हणालें :

"क्या हुआ ?"

"गांधीजी, मला बोटीपर्यंत जायला आगगाडीचें भाडें हवें. मजजवळ तर आतां कांहीं नाहीं."

"ठीक. आपण हिशेब करूं या' गांधीजी म्हणाले. भाडें, हॉटेलमध्यें राहण्याचा खर्च वगैरे सारे धरून हिशेब करण्यांत आला तर ३१० रुपये झाले. गांधीजींनीं सारे पैसे त्याला परत दिले !

* * *

# ११०

आश्रमांत डांसांचा फार त्रास होत होता. महात्माजींना झोंप नीट यायची नाहीं. कोणाजवळ म्हणाले : “ या डांसांना काय करावें ? रात्रीं फार त्रास होतो.”

“ तुम्ही मच्छरदाणी वापरा. सोपा उपाय ” ते मित्र म्हणाले.

गांधीजी विचारमग्न दिसले व नंतर म्हणाले :

“ मच्छरदाणीचा उपाय मला माहीत आहे. परंतु हिंदुस्थानांत किती लोक मच्छरदाणी वापरूं शकतील ? जेथें खायला दोन घास मिळत नाहींत तेथें मच्छरदाणी कोण घेणार ? हिवतापानें लाखों लोक देशांत मरत आहेत. लाखों खेड्यांत गरीब बंधु तापानें त्रस्त आहेत. त्या सर्वांना शक्य होईल असा कोणता इलाज ? ”

पुढें बापूंना कोणी सांगितलें कीं रॉकेलचा हात अंगाला चोळून निजावें. डांस मग जवळ येत नाहींत. गांधीजींना आनंद झाला आणि रॉकेलचा हात अंगावरून फिरवून मग ते झोंपूं लागले.

* * *

# १११

महात्माजी त्या वेळेस महाबळेश्वरला होते. त्यांना भेटायला दिल्लीहून देवदासहि मुलांबाळांसह आले होते. गांधीजींच्या भोंवतीं साऱ्या जगाचा व्याप. पुढारी भेटीला यायचे, साऱ्या जगांतील बातमीदार यायचे. चर्चा चालायच्या. पत्रव्यवहार असायचा.

तो पहा देवदासांचा मुलगा गणित सोडविण्यांत मग्न आहे. परंतु त्याला तें सुटत नाहीं. "हें गणित कसें सोडवायचें सांगतां का?" असें तो मुलगा अनेकांना जाऊन विचारीत आहे. परंतु या मुलाच्या प्रार्थनेंकडे कोण लक्ष देणार ? शेवटीं तो लहानगा आजोबांकडे गेला व म्हणाला : "बापू, इतकीं माणसें आहेत, पण एकजण मला गणित सांगेल तर शपथ. तुम्ही सांगतां का ?"

बापू हरिजन साप्ताहिकासाठीं लेख लिहिण्यांत गढले होते. परंतु त्या बालब्रह्माला ते दूर कसे लोटणार ? ते प्रेमानें म्हणाले : "ये इकडे माझ्याजवळ. काय हवें तुला. अरे त्या लोकांना फार कामें असतात. तूं मलाच आधीं येऊन कां विचारलें नाहींस ? आतां कांहीं अडलें संवरलें तर सरळ माझ्याकडे येत जा. बरें का ? बघूं तुझें गणित ?"

महत्त्वाचा एक लेख लिहिण्यांत गढलेले बापू नातवाची वही घेऊन त्याला गणित समजावून देऊं लागले !

* * *

## ११२

थोरांमोठ्यांपासून मी नेहमीं दूर असतों. सूर्यापासून दूर राहून ऊब घ्यावी व आपल्या जीवनाचा विकास व्हावा म्हणून धडपडावें ही माझी वृत्ति. नाशिकच्या तुरुंगांत असतांना श्री. प्यारेलालजी मला म्हणाले : " तुम्ही सुटल्यावर गांधीजींना भेटा. जमनालालजी भेट करवतील. " मी म्हणालों :

" मी नाहीं जाणार. माझें रडगाणें घेऊन कोठेंहि जायची मला इच्छा नाहीं. " मी सुटून अमळनेरला आलों. जमनालालजींचें पत्र आलें : " तुम्ही या. महात्माजींच्याजवळ तुमची भेट ठरवितों. " मीं लिहिलें : " क्षमस्व. मी येऊं शकणार नाहीं. " पुढें कांहीं दिवस एका खेडेगांवांत मी रहात होतों. महात्माजी अमळनेरवरून वर्ध्याकडे जायचे होते. आम्ही स्टेशनवर त्यांच्यासाठीं व त्यांच्या बरोबरच्या मंडळींसाठीं खाद्यपेय पदार्थ घेऊन गेलों. गाडी सुटायची वेळ झाली. कोणी तरी मला गाडींत लोटलें. दोन स्टेशनें स्वयंसेवक बरोबर जाणार होते. गांधीजी व त्यांच्याबरोबरची मंडळी गाडींत फराळ करणार होती. मग तीं भांडीं घेऊन स्वयंसेवक परतणाऱ्या गाडीनें येणार होते. मी जाणार नव्हतों. परंतु वर लोटला तर गेलों.

" तुम्हांला दोन मिनिटें देण्यांत आलीं आहेत. गांधीजींकडे

जा " मला सांगण्यांत आलें. मी नम्रपणें गांधींजींच्या समोर जाऊन बसलों. प्रणाम केला. त्यांच्यासाठीं आम्ही आंब्याचा रस दिला होता. तो घेऊन ते तें भांडें विसळायला निघाले. मीं पुढें होऊन म्हटलें : 'मी विसळतों.' खुणेनें ते नको म्हणाले. हात तोंड पुसून महात्माजी बसले. मला कांहीं विचारायचें नव्हतें. मला कसली शंका नव्हती. शेवटीं मी मोठ्या कष्टानें म्हणालों : " मी एका खेडेगांवांत राहतों. परंतु मला समाधान नाहीं. लोकांना माझी प्रवचनें नको आहेत. मी त्यांची आर्थिक स्थिति कशी सुधारणार ! "

" गांवांत स्वच्छता करीत जा. "

" ती आम्ही करतों. "

" ठीक तर. लोकांचें आरोग्य सुधारेल. म्हणजे ते अधिक दिवस काम करतील. त्यामुळें आर्थिक स्थिति थोडी सुधारेल. औषधांत पैसे जाणार नाहींत. घरच्या माणसांचा वेळ जाणार नाहीं. निराश होऊन चालणार नाहीं. सेवकाला श्रद्धा हवी. दहा वर्षांत आपल्याला एक समानधर्मी माणूस मिळाला तरीहि पुष्कळ असें वाटलें पाहिजे. "

दोन मिनिटें संपली. मीं प्रणाम करून पटकन निघून गेलों. " श्रद्धा होना ' हे त्यांचे शब्द आजहि कानांत घुमत आहेत.

* * *

## ११३

हिंदुस्थानांत २१ सालीं राजपुत्र आले होते तेव्हां गांधीजींनीं त्यांच्यापुढें लोटांगण घातलें. अशी एक जुनी कल्पित कथा गोलमेज परिषदेच्या वेळेस एकानें छापली. गांधीजींना याबाबत विचारण्यांत आल्यावर ते म्हणाले : “ असल्या गोष्टी निर्माण करणारी कल्पनाशक्ति अर्थशून्य होय. मी हरिजन, भंगी यांच्यापुढें लोटांगण घालीन, त्यांच्या पायांची धूळ मस्तकीं धरीन. परंतु राजासमोर मी कधींच लोटांगण घालणार नाहीं. मग राजपुत्रासमोर तर बोलूंच नका. कारण उन्मत्त साम्राज्यशाही सत्तेचीं तीं प्रतीकें आहेत. हत्तीनें मला चिरडलें तरी चालेल परंतु मी त्याच्यापुढें नमणार नाहीं. परंतु चुकूनहि मुंगीवर पाय पडला तर तिला मी नमस्कार करीन. ”

* * *

## ११४

मीराबेन एका आरमारी अधिकाऱ्याच्या कन्या. गोल-मेज परिषदेच्या वेळेस त्या बापूंबरोबर होत्या. एकजण

मीराबेनकडे येऊन म्हणाला : " मी तुमच्या वडिलांच्या हाताखालीं २१ वर्षे होतों. माझा जांवयीच गांधीजींसाठीं शेळीचें दूध आणतो. मला त्यांची स्वाक्षरी मिळवून द्या. त्यांची भेट करवा. " अखेर त्या माणसाची व गांधीजींची भेट झाली. तो म्हणाला : " तुम्हांला तुमच्या कामांत यश येवो. मी मागील महायुद्धांत भाग घेतला. परंतु पुन्हां झालें तर भाग घेणार नाहीं. युद्ध भयंकर वस्तु आहे. मी युद्धाला विरोध करीन, वेळ पडली तर तुरुंगांत जाईन, तुमच्या ध्येयार्थ लढेन. "

तुम्हांला मुलेंबाळें आहेत ? " गांधीजींनीं विचारलें.

" हो. चार मुलगे व चार मुली, आठ जणं आहेत. "

" मला फक्त चार मुलगे. शर्यतींत तुमच्याबरोबर निम्मे तरी आहें " गांधीजी हंसून म्हणाले आणि सगळ्यांचीं हंसतां-हंसतां मुरकुंडीं वळली.

* * *

## ११५

चार्ली चॅप्लीन हा साऱ्या जगाला हंसवणारा. बोलपटांत काम करणारा. तो गरिबींतून वर आला नि गरिबांतच राही. गांधीजींची व त्याची भेट झाली.

" तुम्ही यंत्रांविरुद्ध कां ? "—चार्लीनें विचारलें.

" देशांत कोटयवधि बेकार. कोणता देऊं धंदा ? म्हणून चरखा दिला. "

" फक्त कपड्यांसाठीं ग्रामोद्योग ? "

" अन्न आणि वस्त्र या बाबतींत प्रत्येक राष्ट्र स्वावलंबी हवें. आम्ही होतोंहि. परंतु इंग्लंडमध्यें यंत्रांमुळें प्रचंड उत्पादन होऊं लागलें. तें खपवण्यासाठीं बाजारपेठा शोधूं लागले. भारताची बाजारपेठ बळकावून आमचें शोषण तुम्हीं चालवलेंत. असें इंग्लंड जगाच्या शांतीला धोका नाहीं ? उद्यां हिंदुस्थानासारखा प्रचंड देश जर प्रचंड यंत्रांनीं उत्पादन करूं लागेल तर तो जगाला केवढा धोका होईल ! "

" परंतु धनाचें नीट वांटप केलें, कामाचे तास कमी केले, कामगारांना अधिक विश्रांति मिळून ते विकासांत वेळ दवडूं लागले तर दुसऱ्यांना गुलाम करून बाजारपेठा ताब्यांत घेण्याची काय जरूर ? तरीहि तुमचा यंत्राला विरोध राहील का ? "

" नाहीं. "

* * *

११८

ब्रिटिश राजकन्येचें लग्न व्हायचें होतें. त्यावेळेस माऊंटबॅटन व्हाइसरॉय होते. राजकन्येला भेट काय पाठवायची ?

महात्माजी रोज खास सूत कातीत होते. त्या सुताचा रुमाल विणून घेऊन ते पाठविणार होते. ती गोष्ट फक्त माउंटबॅटन यांनाच माहीत होती आणि ती गांधीजींच्या हातच्या सुताच्या रुमालाची सुंदर भेट ब्रिटिश राजकन्येला विवाहप्रसंगीं पाठवण्यांत आली. गांधीजी जणूं दोन राष्ट्रांचें त्या धाग्यानें हृदय जोडीत होते.

* * *

## ११७

त्यावेळेस महात्माजी महाबळेश्वरला होते. रोजच्याप्रमाणें ते सायंकाळीं फिरावयास निघाले. जवळच्या खेड्यांतून आलेला एक दहा-बारा वर्षाचा मुलगा रस्त्याच्या कडेला हात जोडून उभा होता. कमरेला एक मळकट लंगोटी फक्त होती. खांद्यावर एक मळलेलें फटकूर होतें. आंघोळहि बहुधा त्यानें केलेली नसावी. गांधीजी बरोबरच्या एका माणसास म्हणाले: "त्याच्याजवळून तें अंगावरचें फडकें मागून घ्या. म्हणावें उद्यां आणून देऊं." तो मुलगा देईना. "उद्यां येथेंच आलास तर खाऊ मिळेल." असें त्याला सांगायला सांगून गांधीजी पुढें निघाले.

दुसऱ्या दिवशीं फिरायला निघायची वेळ झाली. गांधीजींनीं प्यारेलालजींना थोडें खादीचें कापड, खाऊ व साबणवार बरोबर घ्यायला सांगितलें. तो मुलगा तेथें होता. बापूंनीं त्याला जवळ घेऊन कुरवाळलें व सांगितलें : “ अंग व कपडे स्वच्छ धुऊन उद्यां ये. आणखी खाऊ मिळेल.” आणि पुढें रोज गांधीजींची वाट बघत स्वच्छ कपडे परिधान करून हात जोडून तो मुलगा व आणखीहि मुलें तेथें उभीं असत. गांधीजी खरोखरचे राष्ट्रतात होते.

* * *

## ११८

१९३७–३८ सालांतील गोष्ट. अनेक प्रान्तांत कॉंग्रेसचीं सरकारें होतीं. बंगालमध्यें फजलुल हक यांचें मंत्रिमंडळ होतें. कॉंग्रेस सरकारांनीं राजबंदी सारे मुक्त केले. परंतु बंगालमधील राजबंद्यांचें काय ? महात्माजी सर्व राष्ट्राचे तात. ते स्वस्थ थोडेच बसणार ? ते कलकत्त्यास गेले. त्यांनीं बंगालचे गव्हर्नर व मुख्य मंत्री फजलूल हक यांची भेट घेतली. हिंसेचा त्याग करायला राजबंदी तयार असतील तर त्यांना सोडतां येईल, असें गांधीजींस सांगण्यात आलें. गांधीजी तुरुंगांत जाऊन

राजबंद्यांच्या भेटी घेऊं लागले, त्यांना हिंसेचा फोलपणा पटवूं लागले.

गांधीजींना त्यावेळेस रक्तदाबाचा त्रास होत होता. तरी ते राजबंदींच्या मुक्ततेसाठीं प्रयत्न करीत होते. गुरुदेवांनीं लिहिलें : " गांधीजींवर विश्वास टाका. त्यांचा शब्द माना. " ते पहा, महात्माजी तुरुंगांतून चर्चा करून येत आहेत. दोन्ही हातांनीं डोकें घट्ट धरून येत आहेत. रक्तदाब का वाढला ? राष्ट्रपित्याच्या अशा ह्या आठवणी येऊन डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहतात !

* * *

## ११९

कोणाकडे तरी महात्माजी उतरले होते. महत्त्वाचें कांहीं तरी ते लिहीत होते. तेथें जवळच ठेवलेलें एक लहान मूल गडबड करीत होतें, कागदपत्र उडवीत होतें. परंतु बापूंनीं त्या मुलाला कांहीं केलें नाहीं. त्याला ते खेळूंखिदळूं देत होते. परंतु मूल रडूं लागलें. आतां ? तेथें हरिजनकार्यासाठीं कोणी तरी दिलेला दागिना होता. गांधीजींनीं तो सोन्याचा दागिना सोन्यासारख्या त्या मुलाला खेळायला दिला. मूल खेळूं लागलें, बापू लिहूं लागले.

* * *

## १२०

महात्माजी बारीकसारीक गोष्टींतहि फार लक्ष देत. त्यांचा सत्याचा प्रयोग सर्वत्र होता. गोलमेज परिषदेच्या वेळची गोष्ट. जेवतांना ते थोडा मध घेत असत. त्या दिवशीं गांधीजींना जेथें जेवण घ्यायचें होतें तेथें मीराबेन नेहमींची मधाची बाटली बरोबर घ्यायला विसरल्या. जेवायची तर वेळ होत आली. मीराबेनना मधाची आठवण झाली. बाटली तर मुक्कामावर राहिली. आतां ? त्यांनीं लगेच कोणाला तरी जवळच्या दुकानांत पाठवून मधाची एक बाटली मागवून घेतली.

गांधीजी खाणें खायला बसले. मध वाढण्यांत आला. परंतु त्यांचें लक्ष त्या बाटलीकडे गेलें.

"बाटली नवी दिसते. मधाची रोजची बाटली ही नाहीं दिसत."—ते म्हणाले.

"होय बापू. ती बाटली घरीं राहिली. म्हणून येथें ही पटकन् आणली."—मीराबेन भीतभीत म्हणल्या.

थोडा वेळ गंभीर राहून नंतर महात्माजी म्हणाले :

"एक दिवस मध नसता मिळाला म्हणून मी कांहीं उपाशी नसतों राहिलों. परंतु नवी बाटली कशाला आणली ? आपण जनतेच्या पैशांवर जगतों. जनतेच्या पैशाची उधळपट्टी नाहीं होतां कामा."—ते म्हणाले.

* * *

# १२१

मीराबेन हिंदुस्थानांत येऊन फार दिवस नव्हते झाले. गांधीजींच्या तालमींत त्या तयार होत होत्या. त्या दिल्लीला डॉ. अन्सारींकडे गेल्या. मुस्लीम पाहुणचारास सीमा नसते. मीराबेनना विडा देण्यांत आला.

" नको."—त्या म्हणाल्या.

" पान खाण्यांत वाईट काय आहे? पान तर भारतीय सत्काराची खूण. आरोग्याच्या दृष्टीनेंहि उपकारक."—डॉक्टर विड्याची महती सांगूं लागले.

त्यांना वाईट वाटूं नये म्हणून मीराबेननीं विडा खाल्ला. परंतु आपण बरें केलें नाहीं असें त्यांना वाटलें. त्यांनीं तो प्रसंग बापूंना लिहून कळविला. चुकलें का म्हणून विचारिलें. चुकलें असेल तर क्षमा करा म्हणून विनविलें. महात्माजींचें पुढील आशयाचें उत्तर आलें :

" डॉक्टरसाहेबांनीं तसा आग्रह करणें बरोबर नव्हतें. साधकानें अनावश्यक वस्तूंचा स्वीकार करणें बरें नव्हे. मुस्लीमबंधु पान देणें सभ्यतेचें व प्रेमळ सत्काराचें चिन्ह मानतात. परंतु पानाची जीवनाला खास जरूरी नाहीं. साधकानें तर पावलोपावलीं जपलें पाहिजे. कोणीं गळ घातली तरीहि आपलें व्रत सोडूं नये. अशा लहानसान बाबींत खंबीर

न राहिल्यामुळें पुढें ती संवयच होते व मोठ्या बाबतींतहि घसरण्याचा संभव असतो."

महात्माजी निकटवर्ती लोकांच्या जीवनाला किती प्रयत्नपूर्वक आकार देत असत !

* * *

## १२२

गांधीजी आन्ध्र प्रान्तात दौऱ्यावर होते. आन्ध्र तलम खादीसाठीं प्रसिद्ध. चिकाखोल गांवीं खादीप्रदर्शन होतें. गांधीजी आज तेथें यायचे होते. त्या बघा आन्ध्र भगिनी चरक्यावर बसून कातीत आहेत. जवळच कापसाचे पेळू आहेत. एका पेळूंतून तीनतीनशें तार सूत निघत आहे. पन्नास साठ नंबरचें सूत. स्वतःच्या हातच्या सुताचींच वस्त्रें त्या भगिनींनीं परिधान केलीं होतीं. दुधाच्या धारेसारखें सूत निघत होतें. तो अद्भूत देखावा पाहून गांधीजींचें हृदय उचंबळून आलें आणि तेहि चरका घेऊन कांतूं लागले.

एकामागून एक भगिनी येत होत्या व गांधीजींच्या चरणाजवळ स्वच्छ सुताची गुंडी भेट म्हणून ठेवून प्रणाम करून जात होत्या. परंतु या कोण दोन स्त्रिया? त्या दुःखी आहेत.

तोंडावर करुणा, लज्जा, दुःख यांचे शतभाव. बापूंना प्रणाम करून त्या म्हणाल्या :

" आम्ही नीच जातींत जन्मलेल्या. पशुपक्ष्यांहूनहि आम्हांला हीन समजण्यांत येतें. आजपासून खादी वापरण्याचें व्रत आम्ही घेत आहोंत."

गांधीजी गंभीर वाणीनें आश्वासन देत म्हणाले : "जन्मतःच कोणी पापी नसतो. तुम्ही सूत कांता. प्रामाणिक श्रम करून पोटगी मिळवा. सदाचारी रहा. म्हणजे तुम्ही मनुष्योत्तम व्हाल."

बापूंची वाणी सद्गदित होती. त्या दोन बहिणींचीं मुखकमलें आशेनें फुललीं. जणूं नवजीवन मिळालें, नवजीवन सुरू झालें.

* * *

१२६० दि. २०।५।६९
बा.वा.
BVBK-0401260
BVBK-0401260